Impact Factor - 6.8
ISSN- 0474-9030

International Multidisciplinary UGC CARE Listed Journal for Research Publication

# OUR HERITAGE

PEER REVIEWED [REFEREED] INDEXED
UGC CARE LIST GROUP - B RESEARCH JOURNAL
VOL- 68, ISSUE-35, FEBRUARY -2020:
SPECIAL ISSUE ON MULTIDISCIPLINARY STUDIES



# GENDER EQUALITY AND WOMEN EMPOWERMENT

Chief Editor
**Dr. Ansari Md. Haroon Md. Ramzan**
J.A.T Arts, Science & Commerce College
[For Women], Malegaon, Nashik.

Executive Editor
**Dr. Lodhi Kaniz Fatma Niyaz Ahmad**

Associate Editor
**Dr. Salma Ab. Sattar**

SHRI PADMAMANI JAIN ... COLLEGE
Pabal
Tal.Shirur
Dist.Pune

Jadeed Anjuman-e-Taleem's

# J.A.T.

## Arts, Science & Commerce College (For Women) Malegaon Dist. Nashik

Affiliated to

**Savitribai Phule Pune University, Pune-411007**




# One Day Multidisciplinary National Conference On

# "Gender Equality & Women Empowerment"

**Saturday, 15th February 2020,**

**Organized by**

## Dept. of Politics

**Organizers**

**Hon'ble**

**Dr. Ansari Md. Haroon Md. Ramzan**
Principal & Convener


**Dr. Lodhi Kaniz Fatma Niyaz Ahmad**
H.O.D (Politics)
Organizing Secretary

**Dr. Salma Ab. Sattar**
Coordinator

| | |
|---|---|
| Journal Title (in English Language) | Our Heritage |
| Publication Language | English |
| Publisher | Our Heritage Journal |
| ISSN | 0474-9030 |
| Co-Publisher | Eduindex |
| Discipline | Multidisciplinary |
| Subject | Arts and Humanities (all) |
| Email id | editor@ourheritagejournal.com |
| UGC-CARE List Group | Group B |

POST A COMMENT



# Our Heritage

Our Heritage Journal ISSN 0474-9030 is a multidisciplinary journal for research publication. Our Heritage journal is indexed in UGC Care list. Send papers for publication to editor@ourheritagejournal.com

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE
Pabal
Tal.Shirur,
Dist.Pune.

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | राजकीय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग | **डॉ. बेग रेहानाआरा ईस्माइल**<br>सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग श्री पद्ममणि जैन महाविद्यालय पाबळ | 40-45 |
| 11 | "संगीत व स्त्री समानता" | **प्रा. अशोक एस. जाधव**<br>सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख, संगीत विभाग, एस. पी. एच. महिला महाविद्यालय, मालेगांव कॅम्प, जि. नाशिक (महाराष्ट्र) | 46-47 |
| 12 | भारतीय राजकारणातील महिला | **प्रा. अभिलाषा दर्पण शिंदे**<br>सहा. प्राध्यापक (राज्यशास्त्र)<br>म.स.गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगांव कॅम्प ता. मालेगाव नाशिक | 48-51 |
| 13 | लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्प एक विचार प्रवाह | **सुभाष लक्ष्मण अहिरे**<br>सहयोगी प्राध्यापक (इतिहास)<br>के.बी. एच. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय निमगांव ता. मालेगांव जि. नाशिक | 52-54 |
| 14 | महिलांच्या राजकीय सहभागाचा विश्लेषनात्मक अभ्यास | **प्रा. शरद अर्जुन वाघ**<br>राज्यशास्त्र विभाग प्रमुख<br>कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, निमगांव ता. मालेगांव जि. नाशिक | 55-60 |
| 15 | महिला सबलीकरण – राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक भूमिका | **प्रा.डॉ. संभाजी शामराव तनपुरे,**<br>सहाय्यक प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय, भेंडे बु.।। त. नेवासा जि. अहमदनगर, | 61-68 |
| 16 | स्त्रीवादी साहित्यातून महिला सबलीकरण | **प्रा. वर्षा योगेश आहिरे**<br>सहा. प्राध्यापक (मराठी) म.स.गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प, मालेगांव. | 69-71 |
| 17 | महाराष्ट्रातील विधवा पुनर्विवाह चळवळीचा आढावा | **प्रा. योगेश किरण हिरे**<br>महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, मालेगाव. | 72-75 |


SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur Dist.Pune

# राजकीय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग

**डॉ. बेग रेहानाआरा ईस्माइल**

सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग श्री पद्ममणि जैन महाविद्यालय पाबळ

भारताला स्वातंत्र्य मिळुन 70 वर्ष पूर्ण झालेली आहेत तरीही स्वातंत्र्याचे फायदे भारतीय समाजातील महिलांसारखा एक मोठा घटक अजुनही उपभोगू शकत नाही महिलांच्या संरक्षणासाठी व त्यांच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्र आणि राज्य पातळीवर अनेक कायदे करण्यात आले. महिलांचा राजकीय सहभाग आणि नेतृत्व यात वाढ होण्यासाठी आणि लोकशाहीचे बळकटीकरण करण्यासाठी 1993 मध्ये 73 आणि 74 वी घटना दुरूस्ती करून महिलांना भारताच्या स्थानिक राजकारणात प्रथमच 33 टक्के आरक्षण देण्यात आले महिलांच्या राजकीय विकासातील हे पहीले पाऊल होते. पुढे 2010 मध्ये महाराष्ट्र सरकारने महिलांच्या आरक्षणात वाढ करून ते 50 टक्के करण्यात आले. परंतू अजूनही महिला राष्ट्रीय राजकारणात समान प्रतिनिधीत्वापासून वंचीत आहेत. अगदी प्राचीन काळापासून स्त्रिया सामाजिक व कौटुंबिक अन्यायाच्या बळी ठरल्या होत्या पारंपरिक भारतीय समाजात तर स्त्रियांना अनेक हक्कापासून वंचित ठेवण्यात आले होते. पारंपरिक भारतीय समाजात अशा अनेक धार्मिक व सामाजिक प्रथा रूढ होत्या की ज्यामुळे स्त्रियांना अत्यंत तुच्छ लेखण्याची मानसिकता तयार झाली होती. सतीची चाल, स्त्री भ्रुण हत्या, बालविवाह, विधवा विवाहास विरोध, केशवपण, स्त्रियांना शिक्षण घेण्यास प्रतिबंध, बहुपत्नीत्व यासारख्या चालीरीतींचा, रूढींचा स्त्रियांच्या जीवनावर कितीतरी विपरित दुरगामी परिणाम झालेले आहेत. आजच्या सद्यस्थितीतही भारतीय महिलांना अनेक प्रकारच्या गंभीर समस्यांशी झुंज द्यावी लागत आहे. अद्यापही भारतातील पुरूषसत्ताक व्यवस्थेचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन निकोप बनलेला नाही.

व्यक्तीची निर्णयक्षमता वेगळी असते ती तिच्या विचारांच्या प्रक्रियेवर अवलंबून असते. ती निर्णय घेण्याच्या पदावर पोहोचणे अवघड असते. पुरूषप्रधान संस्कृती आणि एकूण सामाजिकस्थिती यात निर्णय घेण्याच्या पदावर स्त्रियांचा संघर्ष पुरूषांपेक्षा वेगळा असतो. कुटूंबाचा पाठिंबा, विशिष्ट क्षेत्रात काम करण्याची त्यांची उर्मी आणि भोवतालची परिस्थिती याचा परिणाम स्त्रीच्या निर्णय प्रक्रियेतील सहभागावर होत असतो. लोकसंख्येच्या 50 टक्के असलेल्या स्त्रियांचे प्रमाण निर्णय घेण्याच्या क्षेत्रात पुरूषांच्या प्रमाणाशी विसंगत,व्यस्त आहे. ग्रामीण, वनवासी, शहर, वस्त्यांमधील स्त्रिया ते उच्चशिक्षित नागरी स्त्रियांपर्यत सर्व स्त्रियांना पुढे जाण्याची ओढ आहे यातून तिचा संघर्ष होतांना दिसतो.

**निर्णय प्रकियेतील स्त्रियांचा सहभाग – प्राचीन संदर्भ**

आजच्या काळात स्त्रियांना दिलेल्या घटनादत्त अधिकारानुसार स्त्रिया विविध क्षेत्रातील निर्णयप्रकियेत सहभागी होवू शकतात. प्राचीन काळची समाजरचना, शासनपध्दती यांचा विचार करता त्या काळातही शासनाचे,


Copyright© 2020

OUR HERITAGE
ISSN: 0474-9030
Impact Factor – 6.8

धर्मशास्त्राचे नियम अस्तित्वात होते. वेदकाळात सामाजिक व गृहजीवनात स्त्रीचे स्थान महत्त्वाचे होते ते पुरुषांच्या बरोबरीने होते. स्त्रीचे पुरुषंप्रमाणे बौध्दिक व आध्यात्मिक जीवन होते, शेती संदर्भात सुगीच्या दिवसात केला जाणारा सीतायज्ञ स्त्रियांनीच करण्याची प्रथा होती. वैदिक काळानंतरच्या टप्प्यात मात्र एकूणच सामाजिक परिवर्तन स्त्रियांच्या स्थानाब**द्दल** झाले. वैदिकधर्माला कर्मकांडांचे स्वरूप प्राप्त झाले. यज्ञसंस्थेचे महत्त्व वाढले त्यामूळे पुरोहितवर्गाचे प्राबल्यही वाढले परीणामी स्त्रीला यज्ञवेदीबाहेर ठेवले गेले,गुरूगृही राहून अध्ययन न करण्याचा अधिकार राहीला नाही, मनू आणि याज्ञवल्क्यने स्त्रीच्या उपनयनाला विराध करून आठव्या वर्षी विवाह करावा या प्रथेने बालविवाहाची प्रथा सुरू झाली, स्त्रीच्या बाबतीतल्या पापपुण्याच्या कल्पना बदलल्या, स्त्री पातिव्रत्याचा आदर्श मानला जावू लागली. या सर्व आदर्शात स्त्रीजीवन गुरफटून गेले. स्त्री पतीपराधिन झाली. वेदकाळात यज्ञ करणारी, वेदसूक्ते रचणारी, ब्रम्हवादिनी स्त्री स्मृतीकाळात कमी प्रतिची ठरली. कौटिलीय अर्थशास्त्रात मात्र स्त्रियांबद्दल उदारमतवादीविचार मांडलेले दिसतात. स्त्रीधनाचा उपयोग करण्याचा पूर्ण हक्क स्त्रीकडे दिला. स्त्रीला घटस्फोटाचा हक्क दिला. वाल्मिकी रामायण, कालिदास प्रभृतींची काव्ये, महाभारत,भारतातील राजकीय वंश यांतून पुढे मात्र काही स्वतंत्र व कर्तबगार स्त्रियां स्वत;च्या गुणवत्तेवर व बुध्दिकौशल्यावर पुढे आलेल्या दिसतात. इसवीसना नंतर अनेक स्त्रियां निर्णयप्रक्रियेत पुढे आलेल्या दिसतात. उदा.वाकाटक काळातील सम्राज्ञी प्रभावती,सातवाहन काळातील राणी नागनिका, 14व्या शतकातील गंगादेवी, 17व्या शतकातील वीरमाता जिजाबाई इ.

**आधुनिक काळ–** आधुनिक काळात समाजसुधारकांच्या प्रयत्नातून स्त्रियांना अधिकार मिळाले शिवाय भारतीय राज्यघटनेनेही स्त्री–पुरूष समता मानून स्त्रियांना अनेक अधिकार दिले. ज्ञान मिळविण्याचा आणि ते वापरण्याचा निर्भिडपणा स्त्री मध्ये आला. या स्त्री शक्तीच्या विकासातून समाजपरिवर्तन झालेले दिसते. भारतात इंग्रज अंमल सुरू झाला राज्यकारभाराच्या सोईसाठी त्यांनी अनेक सोयीसुविधा आणल्या, आधुनिक इंग्रजी शिक्षणाचा पाया रचला, नव्या विचारांचे वारे वाहू लागले. रूढीप्रियता, जातिभेद, स्त्रियांचे शिक्षण असे विषय सार्वजनिक चर्चेत आले. ब्राम्होसमाज,सत्यशोधक समाज,प्रार्थना समाज इ. ची बिजे यात तयार झाली. या प्रबोधनाच्या पर्वात स्त्री जीवनाच्या नव्या पर्वाला सुरवात झाली. स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलू लागला. स्त्री जसजशी शिकू लागली तसतसे एकेका क्षेत्राचे दरवाजे तिच्या साठी खुलू लागले. आत्मविश्वास,आत्मप्रतिष्ठा,स्वसामर्थ्य,महत्वाकांक्षा यांना स्त्री जीवनात स्थान मिळू लागले. वैयक्तीक आयुष्यात आणि सामाजिक क्षेत्रातही अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याची हिम्मत स्त्रिया पुन्हा एकदा दाखवू लागल्या. महात्मा फुले यांच्या प्रेरणेने अनेक स्त्रियां पुढे आल्या आदयशिक्षिका सावित्रीबाई फुले, फातिमाबी यांनी स्त्री शिक्षणाचे काम केले. स्त्री–पुरूष समानतेचा आक्रमक आग्रह ताराबाई शिंदे यांनी धरला, रमाबाई रानडे आणि काशिबाई कानिटकर यांनी बालविवाह प्रथेच्या विरोधातील संमतीवयाच्या कायदयाला पाठिंबा दर्शवण्यासाठी पाचहजार स्त्रियांचा मोर्चा काढला. अषी कितीतरी उदाहरणे सांगता येतील. त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करता त्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभागासाठीचा हा निर्णय धाडसाचेच म्हणावे लागेल.

भारतीय स्वातंयलढयात देखिल स्त्रिया अग्रणी होत्या. 1885 मध्ये भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना झाली,1889 मध्ये दहा स्त्रियांना या सभेचे सदस्यत्व दिले गेले 1918–1923 या पाच वर्षात स्त्रियांना मताधिकार मिळावा


Copyright© 2020

Vol-68 ISSUE-35
February – 2020
Special Issue on Multidisciplinary Studies
OUR HERITAGE
ISSN: 0474-9030
Impact Factor – 6.8

म्हणून अनेक लढे झाले, महात्मा गांधींनी सुरू केलेल्या विविध आंदोलनांमध्ये स्त्रियांची संख्या मोठी होती. 900 सदस्य म्हणून स्त्रियांची नोंदणी असलेले देषसेविका संघ आणि अहमदनगरचे हिंद सेविकासंघ यांचे स्वातंय चळवळीतील योगदान वाखाणण्यासारखे आहे. 1942 च्या चले जाव आंदोलनापासून ते स्वातंयप्राप्ती पर्यंतच्या कालखंडात सत्याग्रह, भुमिगत कार्यकर्त्यांना मदत, निदर्शने,सभा,कारावास इ. सर्व मार्ग स्त्रियांनी हाताळले. 1885 ते 1947 या स्वातं०यलढयाच्या काळखंडात स्त्रियांच्या आंतरिक क्षमता,संवेदना जाग्या झाल्या. हुंडाबळी, प्रौढविवाह, आंतरजातीय विवाह ,जोडीदाराच्या निवडीचे स्वातंय इ. बाबत स्त्रिया स्पष्ट मते मांडू लागल्या. पुढे स्वातं०योत्तर भारतात हिंदु कोड बिलात सुधारणा होवून विवाह, वारसा, घटस्फोट, स्त्रीधन, दत्तक इ. संदर्भात स्त्रियांना कायदेषीर अधिकार मिळाले हा स्त्रियांच्या संघर्षाचा विजय होता आणि आहे. स्त्रियांचा सर्वच क्षेत्रातील प्रवेश सुरवातीला समाजाला न पटणारा होता परंतु आज 21 व्या शतकात मात्र तो स्विकारला गेला. स्त्री कतृत्वाचा आलेख उत्तरोत्तर वाढत असलेला दिसतो. स्वातंयानंतरच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग देखील लक्षणिय आहे. राजकीय चळवळ, महागाई विरूध्द आंदोलन, श्रमिक चळवळ, स्त्री मुक्ती चळवळ, स्त्री अत्याचार विरोधी चळवळ, दारूबंदी, शेतजमीनीची मालकी, निसर्गसंवर्धन अशा अनेक सामाजिक प्रश्नांवरील आंदोलन चळवळीत स्त्रिया सहभागी होतांना दिसतात अनेक चळवळींचे नेतृत्व स्त्रिया करतांनाही दिसतात. देश उभारणीच्या, परिर्वनाच्या संघर्षाच्या कामात त्या सहभागी होतात. यातून त्यांची विचारांशी असलेली बांधिलकी, समाजबदालाची तळमळ दिसून येते. सांविधानिक दुरूस्त्याकरून स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविण्याचेही प्रयत्न झालेले दिसतात त्यासाठी देखिल स्त्रियांना अनेक वर्षे लढा दयावा लागला.

**महिलांचा राजकीय निर्णय प्रकियेतील सहभाग –**

**1952 ते 2019 या काळातील लोकसभा निवडणूकातील महिला प्रतिनिधिंची संख्या**

| अ.क्र | लोकसभा निवडणूकीचे वर्ष | लोकसभेतील एकूण जागा | महिला उमेदवारांची संख्या | विजयी महिला खासदारांची संख्या | महिला मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1952 | 489 | — | 22 | — |
| 2 | 1952 | 494 | 45 | 27 | 4.45 |
| 3 | 1962 | 494 | 66 | 34 | 6.27 |
| 4 | 1967 | 520 | 67 | 31 | 5.57 |
| 5 | 1971 | 520 | 86 | 22 | 4.05 |
| 6 | 1977 | 542 | 70 | 19 | 3.50 |
| 7 | 1980 | 529 | 143 | 28 | 5.29 |
| 8 | 1984 | 542 | 171 | 44 | 7.94 |
| 9 | 1989 | 523 | 198 | 29 | 5.48 |
| 10 | 1991 | 536 | 330 | 39 | 7.11 |
| 11 | 1996 | 543 | 599 | 39 | 7.36 |
| 12 | 1998 | 543 | 274 | 43 | 7.91 |
| 13 | 199 | 543 | 784 | 49 | 9.02 |
| 14 | 2004 | 543 | 355 | 44 | 8.29 |
| 15 | 2009 | 543 | 556 | 59 | 10.86 |
| 16 | 2014 | 543 | 631 | 62 | 11 |


Copyright© 2020

OUR HERITAGE
ISSN: 0474-9030
Impact Factor – 6.8

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 17 | 2019 | 543 | 724 | 78 | 14.58 |

वरील आकडेवारीवरून आपल्याला महिलांचा राजकीय सहभाग हा समाधानकारक नसलेला दिसतो. पहिली लोकसभा निवडणूकही स्वात०य चळवळीने प्रभावित झालेली असल्याने चळवळीत सहभागी महिलांचा समावेश राजकारणात दिसतो. उदा. विजयालक्ष्मी पंडीत, मथू लक्ष्मी रेड्डी, पद्मजा नायडू, सुचेता कृपलानी इ. सर्वच लोकसभा निवडणूकीतील महिलांच्या प्रतिनिधित्वाची सरासरी कमी असलेली दिसते.

73 आणि 74 व्या घटनादुरूस्तीने महिलांना पंचायतराज स्तरावर 33 टक्के आरक्षण दिले. राजकीय व्यवस्थेच्या परीघाबाहेर असलेली स्त्री निर्णय प्रक्रियेत आली. शहरात राजकारण आणि आपले दैनंदिन जीवन जेवढे वेगळे असते तेवढे गावात नसते. गावात समाजकारण आणि राजकारण वेगळ करताच येत नाही. गावातल्यांना त्यामुळे रचना समजायला अवघड जाते. व्यक्ती समजू शकते परंतु व्यक्ती निरपेक्ष रचना समजत नाही. घटना दुरूस्तीने स्त्रीचा आत्मविश्वास वाढला आहे. आपल्या अधिकारांची ज़ाणीव तिला झाली आहे. 33 टक्के आणि आता 50 टक्के आरक्षण झाल्याने विविध राजकीय पक्षांनी त्यांना उमेदवारी, पक्षातील प्रमुख पद दिलेले दिसते. निवडून येण्याची क्षमता हा महिलांसाठी नेहमीच आव्हानाचा मुद्दा राहिला आहे. परंतु अलिकडच्या काळात माध्यमांतून येणा–या विविध विषयांमुळे स्त्रिया जागरूक झाल्या आहेत. त्या आपल्या क्षमता वाढवत आहेत. आरक्षणामुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे. परंतु निवडणुकीची गणिते ही जातीबध्द झाली आहेत. मतदार संघ राखीव झाला तर एखाद्या उमेदवाराने त्या प्रभागात चांगले काम केले असेल तरी देखिल आरक्षणातून जो जिंकेल त्यालाच उमेदवारी दिली जाते. हे गुंतागुंतीचे आणि त्रासदायक आहे. राजकारणात येणा–या महिलांना कुटुंबातून पाठींबा मिळणे हे अजूनही कठीनच आहे. एकवेळा नोकरी करण्याला पाठींबा दिला जातो. परंतु राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्यास पाठींबा दिला जात नाही. जर कुटुंबाच्या मदतीने स्त्रीयांचा राजकारणातील व निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला तर समाजासाठी ते उपयुक्तच ठरेल. तसेच महिलांचा राजकारणातील व निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढण्यासाठी पुरूषांचा सकारात्मक दृष्टीकोन व पाठिंबा मिळायला हवा. जसजसे महिलांचे नेतृत्व घडत जाते तसतसे त्या अनेक प्रश्नात रस घेतात व प्रश्न सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात. राजकारणात काम करतांना महिलांवर काही सामाजिक बंधने येतात. त्यामुळे अनौपचारीक रित्या होणा–या राजकीय शिक्षणापासून त्या वंचित राहतात. पुरूषांबरोबर सर्व ठिकाणी त्या सहभागी होवू शकत नाहीत. स्त्रीयांचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग अधिक वाढविण्यासाठी राजकीय पक्षांना आपल्या घटनेत बदल करावे लागत आहेत तसेच स्त्रियांनाही आता अधिक अभ्यासू आणि जागरूक व्हावे लागत आहे. आपली मते विचारात घेतली जातील यासाठी स्त्रियांनाही अधिक खंबीर होण्याची गरज आहे. ज्या दिवशी महिलांना वेगळे हक्क मागण्याची गरज पडणार नाही व समाजातून देखिल महिलांना आम्ही हक्क देतो ही भावना जाईल तेंव्हाच खरी प्रगती होवू शकते.

भारतात 1995 ते 2005 या कालावधीत महिला प्रतिनिधींची टक्केवारी 4.8 टक्के इतकी वाढली आहे. 1996 मध्ये भारतीय संसदेत महिला 7.2 टक्के होत्या. 2014 मध्ये हे प्रमाण 12 टक्के झालेले आहे. भारतात


Copyright© 2020

स्वातंत्र्योत्तर काळात महिलांना मतदानाचा उमेदवारीचा अधिकार सर्वांप्रमाणेच मिळाला ही भारतीय संविधानाची देण आणि लोकशाहीचे यश आहे. 1957 ते 2014 या कालावधीत प्रत्यक्ष मतदान करणा–या स्त्रियांचे प्रमाण 38 टक्क्यांवरून 65 टक्क्यांपर्यंत वाढले आहे. त्या पुरूषांच्या बरोबरीने मतदानाचा हक्क बजावताना दिसत आहेत. परंतु याउलट परिस्थिती निवडणुकीतील उमेदवारीबाबत दिसते. 1957 ते 2014 या कालावधीत झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये उभे राहिलेल्या उमेदवारांची आकडेवारी पाहता पुरूष उमेदवार हजारांमध्ये दिसतात तर स्त्रियांचे प्रमाण त्या तुलनेने अत्यल्प आहे. निवडून येण्याची त्यांची शक्यता हा निकष महिलांना उमेदवारी देताना अधिक कसोशीने पाळला जातो हे यावरून दिसते. त्या दृष्टिने 73 आणि 74 वी घटनादुरूस्ती व महिला आरक्षण महत्त्वाचे ठरते. लोकसभेत महिलांना 33 टक्के जागा राखीव ठेवाव्यात असे विधेयक अनेकदा सदनासमोर ठेवण्यात आले. कोणतीही विचारसरणी असली तरी सर्वच पक्षाचे या विधेयकाला विरोध करण्यावर एकमत झालेले दिसते. लोकसभेतील महिलांच्या सहभागाबद्दल इतकी निराशाजनक परिस्थिती आहे. याबरोबरच भारतात पुरूषप्रधान आणि पितृसत्ताक समाजव्यवस्था असल्याने कुटुंबाच्या देखभालीची जबाबदारी स्त्रियांना घ्यावी लागते. त्या कितीही शिकल्या, मोठया पदावर कार्यरत असल्या तरीही घरच्या जबाबदारीतून त्या पूर्णपणे मुक्त नसतात. अशा परिस्थितीत त्यांना समाजकारण व राजकारणात आपले स्थान निर्माण करणे कठीण होते. अनेकदा त्यांना या प्रतिकूल परिस्थितीशी लढा द्यावा लागतो. स्थानिक राजकारणात महिलांना आरक्षण मिळाल्याने राजकारणातील त्यांच्या सहभागावर सकारात्मक परिणाम झाला आहे. महिला सक्षमीकरणाला अधिक प्रोत्साहन मिळाले आहे. लोकशाही यशस्वी करायची असेल तर लोकशाहीतील निम्म्या लोकसंख्येकडे (महिला) दुर्लक्ष करून चालणार नाही हेही तितकेच खरे.

**उपाययोजना :–**

तळागाळातील आणि दुर्लक्षित घटकांपर्यंत लोकशाहीचे विकेंद्रीकरण करून लोकशाहीचा पाया बळकट करावयाचा असेल तर महिलांना राजकारणापासून दुर ठेवून चालणार नाही म. गांधींच्या मते महिला या भारताची अर्धी शक्ती आहे तिला बंधनात टाकून भारत विकास करू शकणार नाही. ज्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना 50 टक्के आरक्षणाची तरतूद केलेली आहे त्याचप्रमाणे लोकसभा, राज्यसभा, प्रत्येक घटकराज्याची विधानसभा आणि विधानपरिषदांमध्ये महिलांना 50 टक्के राखीव जागा देणे अनिवार्य आहे. महिलांचे हे आरक्षण विविध प्रवर्गाकरिता लोकसंख्येनुसार असावे महिलांना केवळ पन्नास टक्के आरक्षण देवून चालणार नाही कारण आपण स्थानिक स्वराज्य संस्थातील महिलांच्या आरक्षणातील अडथळे पाहतो की जरी महिला राजकीय पदावर आली तरी ती केवळ सहयांची मालक असते तिच्या वतीने निर्णय घेणारा तिचा पती, मुलगा, वडील किंवा अन्य पुरुष असतो त्यामुळे स्त्रिला पुरूषांच्या राजकीय सामाजिक दडपणापासून मुक्त व्हावे लागेल तरच ती चांगल्या प्रकारे कार्य करू शकेल. राजकीय सक्षमीकरण करण्यासाठी तिला अर्थार्जनाचा अधिकार आणि स्वातंव्य असावे ज्यामुळे ती नवऱ्याच्या अथवा पतीच्या पैशावर अवलंबून राहणार नाही. बहूसंख्य महिला या उच्च शिक्षणापासून वंचीत राहतात खरे तर उच्च शिक्षण हे स्त्रीचे राजकीय सहभाग वाढण्याचे महत्वाचे साधन आहे. पुरूषसत्ताक मानसिकता बदलण्यास महिलांनी पुरूषांना भाग पाडले पाहिजे.


Copyright© 2020

महिलांच्या राजकीय सहभागापुढील असणारे अडथळे दूर करणे आवश्यक आहे. उदा. कुटुंब आणि राजकारण ही दुहेरी कसरत तिला करावी लागते, महिलांचे शिक्षणातील अल्प प्रमाण, पुरूषप्रधान संस्कृती आणि राजकीय वारसा,जात हा महिलांचा राजकीय सहभागातील महत्वाचा अडथळा, निवडणूक–पैसा आणि महिला इत्यादि अडथळे दूर झाल्यास महिलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग निश्चित वाढेल यात शंका नाही.

**संदर्भसूची –**

1. संपा पवार उर्मिला – आम्ही इतिहास घडवला
2. संपा. बनहट्टी ब.ना. आणि शाहणे मो. षा. – भारतीय स्त्री
3. संपा. चिटणिस सु. मा, आणि दातार छाया – स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा
4. संपा. नानिवडेकर मेधा – महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा
5. तुंळपुळे मालिनी – स्त्री चळवळीची वाटचाल
6. पवार वैषाली – महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख
7. महिला विश्व विषेशांक 2016– निर्णयप्रक्रियेतील महिला
8. अमृतकर प्रशांत, स्त्री आणि राजकारण, चिन्मय प्रकाशन, मुंबई

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403


Copyright© 2020